# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष १ ले. अंक ८ वा. नवी मुंबई    दिनांक १ ते २९ फेब्रुवारी २०१२  पाने १६    किंमत २० रूपये

गर्दीत गारद्यांच्या
सामील रामशास्त्री,
त्याच्या पल्याड त्यांची
कोठेच धाव नाही !




साध्याच माणसांचा
एल्गार येत आहे,
हा थोर दांभिकांचा
गांडू जमाव नाही !!

# जनतेच्या हक्कावर शासन घालतेय कठोर घाव
# माहिती अधिकार कायदा संपविण्याचा कुटील डाव




## भ्रष्ट राज्यव्यवस्थेच्या विरोधात जनसमान्यांची हक्काची लढाई

## रेडिमेड प्रश्नावली



सरकारी विभागांना
काय व कोणती
माहिती मागावी ?

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक
# नागरिक अधिकार

सुभाष बसवेकर
● संपादक ●
गणेश काजळे-पाटील
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी
किरण मांजरेकर (मुंबई)
कु.शीतल कापूरे (नवी मुंबई)
राजेश बने (रायगड)
भगवान वाहूळे (पूणे)
राजेश ठाकूर (नागपूर)
प्रीतम यादव (सातारा)
अजित कोठारी (जालना)
देविदास चौथमल (औरंगाबाद)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाहीसर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : नागरिक अधिकार
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com

रजि नं.MAHMAR/2011/40781

नागरिक अधिकार या मासिकासाठी स्वराज बहुउद्देशीय संस्था,खारघर नवी मुंबई यांच्याकडून छपाई व वितरणासाठी अर्थसाहय उपलब्ध झाले आहे.

संपादकीय...........

## सावधान !

## “ आरटीआय ची नसंबदी होतेय ”

माहिती अधिकार कायदा २००५ साली देशात लागू झाला. तेव्हा देशभर परिवर्तनावादी कार्यकर्त्यांनी जल्लोषात त्याचे स्वागत केले होते.मा.अण्णा हजारे यांनी तर देशातील सामान्य नागरिकांना माहिती अधिकार मिळाला ही दुसऱ्या स्वातंत्र्याची नांदी होय असे म्हटले होते. या देशातील १०० कोटी हून अधिक सामान्य माणसे या देशाचे खरे मालक असून त्यांना लोकसेवकांना जाब विचारण्याचा अधिकार प्राप्त झाला.हा कायदा मोठे परिवर्तनकारी व प्रभावी अस्त्र ठरेल असा विस्वास सामान्य माणसांच्या डोळयात दिसत होता.प्रसिद्धी माध्यमांनीही माहिती अधिकार कायद्यांचे पल्लेदार वर्णन केले होते. २००५ साली माहिती अधिकार कायद्याच्या संदर्भात देशभर मोठे आशादायी चित्र दिसत होते. गेल्या पाच-सहा वर्षात पुलाखालून खूप पाणी वाहून गेले.माहिती अधिकाराचे टोकदार शस्त्र राठ कातडी असणाऱ्या शासन व प्रशासन नावाच्या गेंडयाला चांगलेच बोचू लागले होते.पूर्वोत्तर राज्यातील खाद्यान्न घोटाळा,सुरेश कलमाडी यांचा खेळखंडोबा, राजाचा टुजी घोटाळा,महाराष्ट्रातील आदर्श घोटाळा अशी प्रकरणे आरटीआय कार्यकर्त्यांनी बाहेर आणण्यास सुरूवात केली.अगदी सामान्य माणसांनी ही राशन,पाणी,वीज,आरोग्य सुविधा, शिक्षण अशा गरजा पुरविणाऱ्या यंत्रणांना माहिती अधिकार कायदा वापरून सामान्य माणसांची ताकद दाखवायला सुरूवात केली होती....

. परंतु हाय पुन्हा एकदा सामान्य माणसाचे दूदैव त्याला आडवे तर येत नाही ना अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.अवघ्या सहा वर्षापूर्वी जल्लोषात नाचणारे आरटीआय कार्यकर्त आज पदोपदी रडत आहेत.आक्रंदत आहेत.शासन व प्रशासनातील डुढ्ढाचार्यांना आता हा डोकेदुखी ठरलेला कायदाचा नको आहे.म्हणून एक अप्रत्यक्ष षढयंत्र रचले जात असून कार्यकर्त्यांना माहितीच द्यायची नाही, नवीन माहिती आयुक्त नियुक्ती करण्यात दिरंगाई लावायची,देशभरातील कार्यकर्त्यांनी देशभर लाखो द्वितीय अपिले तुंबवून ठेवायची,माहिती न देणाऱ्या जन माहिती अधिकाऱ्यास कसलीच शास्ती न करता अभय द्यायचे. अशा प्रकारे वर्तन करून माहिती अधिकार कायद्याचा हळूहळू निष्प्रभ करून सपंवायचा डाव देशभर सुरू झाला आहे

जो अगोदर मनातून मैदान सोडतो त्याचाच पराभव होतो.जो टिकून राहतो तोच विजयी ठरतो.

# आमचा पैसा, आम्हाला पाहिजे हिशोब !

जम्मू आणि काश्मिर मधील आरटीआय प्रसार व प्रचार करणाऱ्या संस्था व संघटनांनी सद्या तेथे एक राज्यव्यापी आंदोलन सुरू केलयं. त्या आंदोलनाची घोषणा आहे

" हमारा पैसा हमारा हिसाब"

आपण या आंदोलनापासून काही बोध घेऊन महाराष्ट्रातील आपल्या भागातील शासन व प्रशासन यंत्रणेकडून आपल्या पैशाचा हिशोब मागीतला पाहिजे.




ही काही वानगी दाखल उदाहरणे

आपल्या गावातील / शहरातील रस्ते, विकासकामे इमारत बांधकामे यांच्यातील खर्चाचा हिशोब मागा. स्थानिक स्वराज संस्थाना मिळणारा निधी, कररूपाने गोळा होणारा निधी, सामान्य माणसांना मिळालेल्या मदत यांचा हिशोब मागा.

शेतकऱ्यांना पंचायत समितीकडून मिळणाऱ्या वस्तू जसे, कृषी अवजारे, फवारणी पंप, इंजिन, इतर वस्तू या प्रत्यक्ष योग्य व पात्र लाभार्थी पर्यंत मिळतात का ?

शहरी व ग्रामीण भागात दारिद्रय रेषेखालील, महिलांना, विधवा महिलांना शिलाई मशीन, कांडप मशीन, शेवया मशिन व अन्य मदत वाटली जाते.ती योग्य व पात्र लाभार्थींना मिळते का ?
ग्रामीण व शहरी भागात दारिद्रय रेषेखालील मुलींना शाळेत उपस्थिती भत्ता देण्याची सरकारी योजना आहे परंतु प्रत्यक्षात मुलींना तो मिळतो का ? शोध घ्या.
शाळेत गरीब मुला -मुलींना सायकल, गणवेश, पुस्तके वाटप होते.प्रत्यक्षा किती मंजूर झाले, किती वाटप झाले.पात्र व गरजूना मिळाले की मध्येच कोणी लांडगयांनी खाल्ले याचा हिशोब घ्या.

आम्ही भारतीय जनता रोज काबाडकष्ट करतो.आमचा शेतकरी भाऊ शेतीत रक्त आणि घाम गाळतो अन्नधान्य निर्माण करतो.कामगार व श्रमिक घाम गाळून संपत्ती व चिजवस्तू निर्माण करतात.या देशातील प्रत्येक माणूस या संपत्तीचा उपभोग घेताना त्यावर सरकारला टॅक्स भरतो.सामान्य माणसाने अगदी हॉटेलात दहा रूपयांचे शंभर ग्रॅम भजे जरी खाल्ले तरी यावर सरकारला बेसन पीठ, तेल यांच्या उत्पादनावरील विक्रीकराच्या माध्यमातून रूपयां दोन रूपयांचा कर गेलेला असतो.अगदी १० रूपयांचा मोबाईल रिचार्ज केला तरीही शासनाला गरीब माणसाचे २ रूपये कराच्या रूपाने जमा झालेले असतात.सांगण्याचा उद्देश हा की सरकारकडे जमा झालेले अब्जावधी रूपये हे जनतेचे असतात.हा जनतेचा पैसा जनतेच्या उपयोगासाठीच वापर झाला पाहिजे.यावर मध्येच भ्रष्ट लांडग्यांनी ताव मारता कामा नये.सत्तेतील भ्रष्ट लोकसेवक व अधिकारी व कर्मचारी मंडळीनी या पैशाचा अपहार न केला पाहिजे. मात्र आज असे होताना दिसत नाही. सत्ताधारी व प्रशासनातील भ्रष्ट लोकसेवकांचे जागोजागी रॅकेट तयार झाले असून ते जनतेच्या पैशावर ताव मरीत आहेत.प्रत्येक खात्यात व प्रत्येक योजनेत हजारो भ्रष्टाचाराची प्रकरणे दिसून येत आहेत.हा देश एक मोठी व भ्रष्ट गटारगंगा झाला अहे.

रस्ते, वीज, पाणी, सार्वजनिक अन्न पुरवठा, इंधनपूरवठा, गरीबांसाठीच्या हजारो योजना, स्थानिक स्वराज संस्थापासून ते अगदी मुंबई व दिल्ली तील मोठमोठया योजना पर्यंत सगळीकडे भ्रष्ट लाडग्यांचा टक्का ठरलेला असतो.सामान्य माणूस या टक्कयाकडे डोळ वटारून पाहत नाही.म्हणून त्यांची मजा आहे.परंतु आता सामान्य माणूस पेटून उठणार आहे.भ्रष्टांचे दिवस भरत आहेत.

चूका डोक्यात घालण्यापेक्षा त्या पायाखाली घेतल्या तरच जीवनातली उत्तरे क्षितीजावर आलेले दिसतील.

## तहसील कार्यालयाच्या माध्यमातून गावातील गरीब,निराधार स्त्री-पुरषांना मिळणारे अर्थसाहय याची चौकशी तसेच लेखाजोखा तपासण्यासाठी नागरिकांनी करायच्या अर्जाचा नमूना

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती आधिकारी
तहसील कार्यालय,
ता. ----------------- जि. ----------

१)अर्जदार------------------------------------------------------------------------------

२) पत्ता : ------------------------------------------------------------------------------

३) माहितीचा विषय :तहसील कार्यालयामार्फत संजय गांधी निराधार योजना शेतमजूर निवृत्ती वेतन योजना, विधवा अर्थसहाय्य आदि योजनांच्या माध्यमातून मिळणाऱ्या शासकीय मदतीची माहिती मिळणेबाबत.

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (सन २०११ व २०१२)

१) संजय गांधी निराधार योजना शेतमजूर निवृत्ती वेतन योजना, विधवा अर्थसहाय्य आदि कोणकोणत्या योजना आपल्या तहसील कार्यालयामार्फत राबविल्या जातात त्या सर्व योजनांची नावे, योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव, अशा योजनासाठी कोणाकडे अर्ज करायचा त्या सक्षम अधिकाऱ्यांचे नाव व पत्ता असा तपशील द्यावा

२)संजय गांधी निराधार योजना शेतमजूर निवृत्ती वेतन योजना, विधवा अर्थसहाय्य आदि योजनाचे ------------------ या आमच्या गावात किती लाभार्थी आहेत ? योजनेचो नाव लाभार्थीची संख्या,नाव व पत्ता द्यावा.आदी तपशील द्यावा.

३) संजय गांधी निराधार योजना शेतमजूर निवृत्ती वेतन योजना, विधवा अर्थसहाय्य आदि योजनांसाठी आमच्या ---------------------- या गावातून सन २०११ मध्ये आणि सन २०१२ मध्ये आज तारखेपर्यंत किती लोकांनी लाभार्थी म्हणून अर्ज सादर केले ? किती अर्ज मंजूर झाले मंजूर अर्जदारांची नावे किती अर्ज नामंजूर झाले अशा सर्व अर्जदारांची नावे आदी तपशील द्यावा.

४) आमच्या गावातील वरील अर्थसाहय योजना पात्र लाभार्थींना शेवटचे अर्थसाहय कोणाला किती व केव्हा भेटले याचा कागदोपत्री तपशील द्यावा.

५) वर उल्लेख केलेल्या प्रत्येक योजनेत पात्र ठरण्यासाठी कोणकोणते शासकीय निकष आहेत.अशा निकष व नियमावलीची एक लेखी प्रत असणाऱ्या कागदपत्राची छायांकित कॉपी द्यावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :
६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही
दिनांक : --------------------- (नाव -----------------)
मो.नंबर: ०००००००००००

अंधारातून रस्ता जरी नावाड्यालाच शोधावा लागतो तरी त्याला दीपस्तंभ हा फार आश्वत वाटत असतो.

सक्सेस स्टोरीज

# कृपाशंकर सिंह यांना जमीनीवर आणणारा संजय तिवारी

**जर कार्यकर्त्यांनी हिंम्मतीने व चिकाटीने प्रशासकीय व कायदेशीर लढाई लढली तर आजच्या प्रतिकूल वाटणाऱ्या परिस्थितीतही सामान्य माणसांची ताकद काय असते हे भ्रष्ट सत्ताधाऱ्यांना दाखवून देता येत हे संजय तिवारी यांनी कृपाशंकर सिंग यांच्याप्रकरणात दाखवून दिले आहे.**

दिड वर्षापूर्वी महापालिकेसमोरील कॉंग्रेसभवनात कृपाशंकरसिंग यांना पत्रकारांनी छेडलं,सिंग साहेब हा संजय तिवारी कोण ?तो तुमच्या का मागं लागलाय ?त्यानं कोर्टात धाव घेतलीय ?कृपाशंकर सिंह उसळून त्वेषांन म्हणाले,अहो असे तथाकथीत समाजसेवक म्हणविणारे पैशाला पन्नास विकत मिळतात.त्याला कोठेही धावाधाव करू दे, माझं काहीच वाकडं होणार नाही .......मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष,महाराष्ट्राचे माजी गृहराज्यमंत्री कृपाशंकर सिंग संजय तिवारी बद्दल अतिशय तुच्छतेने परंतु एका कडवड टोनमध्ये बोलत होते.आपल्या वाटेवर काटे घालणाऱ्या सगळयांना विकत घेऊ कारण आपले थेट हायकमांडशी नाते आहे हा विस्वास त्यांच्या वागण्या-बोलण्यातून दिसत होता.

परंतु कोर्टात गेल्यापासून वर्ष , दीड वर्षे संजय तिवारी या तरूण कार्यकर्त्यांने सतत्याने व चिकाटीने प्रकरण लावून धरले.आणि फेब्रुवारी २०१२ मध्ये कृपाशंकर सिंग यांना कोर्टाने अनअपेक्षित दणका दिला.आज पर्यंत नाही नाही त्या लांडयालबाडया करून जमविलेल्या संपत्तीवर न्यायालयाची टाच आली."कृपांना अटक होणार "," कृपाशंकर सिंह फरार ", "कृपाशंकर बाराच्या भावात",अशा बेक्रींग न्यूज वृत्तवाहिन्यावर अगदी काही दिवसापर्यंत त्या संजय तिवारीला जितके पळायचे तितके पळू द्या माझे काहीच वाकडे होणार नाही म्हणणारे कृपाशंकर सिंग यांना पूर्ण फेब्रुवारी २०१० च्या अखेर कोर्टाच्या दणक्यापासून वाचता यावे म्हणून पळता पळता अगदी तोंडाला फेस आला.

श्रेष्ठीचा वरदहस्त,सत्तेच्या वर्तुळातील उठबस,सत्तेला वाकवून मिळविलेल्या संपत्तीचा दर्प,आणि कायम कायदे धाब्यावर ठेवून विविध मंत्रालय, सचिव मंडळी व सरकारी यंत्रणा यांच्या पोकळ पोकळीतूनच कायम कामं करून घेण्याची लागलेली सवय यातून कृपाशंकरसिंह यांनी तिनशे कोटीची संपत्ती जमा केली.पोत्यांन कमवायचं आणि थैलीने वाटायचे अगदी दिल्ली पासून गल्ली पर्यंत ..... ही कृपशंकर सिंह यांची कार्यशैली होय,परंतु संजय तिवारी नावाच्या एक सामान्य माहिती अधिकार कार्यकर्त्यांने कृपाशंकर सिंग यांचे विमान जमीनवर आणले.एक सामान्य कार्यकर्ता एक भ्रष्ट सत्ताधाऱ्यांला कशी वेसन घालू शकतो हे संजय तिवारी या तरूणाने सिद्ध करून दाखविले आहे.

मुंबई पोट भरणसाठी लाखो लोक येतात तसेच ३० वर्षापूर्वी कृपाशंकर सिंह आले. सुरवातीला त्यांनी कांदे-बटाटे विकणाच्या व्यवसाय सुरू केला.मग एक एक पायरी चढत कृपाशंकर सिंग अब्जाधिश कसे झाले ? याचा शोध संजय तिवारी यांनी घेतला.पुरावे गोळा केला. लाचलूचपत प्रतिबंधक विभाग व अन्य तपास यंत्रणांयाच्या कडे तक्रारी दाखल केल्या. परंतु सरकारी तपासयंत्रणा सरकारी व्यवस्थेतील कृपाशंकर सारख्या वजनदार आसामीचा तपास मंद गतीने व कृपाशंकर यातून कसे सहिसलामत सुटतील अशाच पध्दतीनेच करू लागल्या. दरम्यान स्वत:ला बीएसी पास भासविणारे कृपाशंकर सिंग प्रत्यक्षात बारावी नापास आहेत.तसेच त्यांच्याकडे दोन पॅनकार्ड आहेत हे संजय तिवारी यांनी शोधून काढले होतेच. कृपाशंकर सिंग सारख्या बलाढय आसामीच्या विरोधात पंगा घेणे एवढे सोपे नव्हते.अमिषे आली, धमक्या आल्या,परंतु संजय तिवारी डगमगले नाहीत. आणि अखेर कृपाशंकर सिग यांच्या ३०० कोटीच्या संपत्तीवर न्यायालयाने जप्तीचा आदेश दिला.पोलीस खात्याला माजी गृहराज्यमंत्र्यावर कारवाई करावी लागली. आजच्या विपरीत परिस्थीतीतही एक सामान्य कार्यकर्ता एक महाबलाढय भ्रष्ट सत्तधाऱ्याला त्याची खरी जागा दाखवू शकतो.हॅट ऑफ संजय तिवारी.

सत्य हे कटू असले तरी त्याचे साईड इफेक्ट नसतात.असत्य सोईचे असले तरी त्याचे परिणाम भयंकर ठरतात

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विश्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

## आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक **नागरिक अधिकार** या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून **20102640492** या नंबरच्या खात्यावर सुभाष बसवेकर (संपादक नागरिक अधिकार पनवेल शाखा) या नावाने पैसे भरू शकता.बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर नियमित अंक पाठवला जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार व जागरूक नागरिकांकडून शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्येसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर, नवी मुंबई-४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ----------------------------------------------------

पत्ता :----------------------------------------------------

------------------------------------ पीनकोड

मोबाईल :

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक

व्यवसाय :-------------------- येणाऱ्या भाषा: ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /------------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी सभासद फी व नागरिक अधिकार मासिकाची वार्षिक वर्गणी असे एकत्रीत ३०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व मासिकाचे अंक मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन. आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

सभासद कोड नंबर

### कार्यालयीन उपयोगासाठी

मासिक वर्गणी नंबर

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१२ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१३
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- मासिकांचा अंक पाठविण्यास सुरूवात केलेला महिना व वर्ष ------------- / २०१२
- मासिक वर्गणी व सभासद फीस रूपये मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली
- शेरा ----------------------------------------------------------------------

अनेक वाईट माणसे जोडणे कदाचित तोटयाचे ठरणार नाही, परंतु एक चांगला माणूस तूटणे फार नुकसानकारक ठरू शकते.

# माहिती अधिकार कायदा संपविण्याचा कुटील डाव

## नागरिकांच्या तक्रारी

●जनमाहिती अधिकारी माहिती देत नाहीत.तरी त्यांना बहुतांश प्रकरणात माहिती आयुक्त शास्ती व दंड करीत नाहीत. खरे तर जनमाहिती अधिकाऱ्याने माहिती न दिल्यानेच व प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने न्याय न दिल्यामुळेच नागरिक माहिती आयुक्ताकडे दुसरे आपिल दाखल करतात. हे आणखी वेगळे पुरावे देवून सिद्ध करण्याची गरज नसल्यामुळे द्वितीय अपिलात आलेल्या साधारणपणे सर्व प्रकरणात शास्ती व दंड व्हायलाच पाहिजे. परंतु द्वितीय अपिलात दंड व शास्ती होण्याचे प्रमाण अतिशय नगण्य आहे.सबब जनमाहिती अधिकाऱ्यावरील कायद्याचा वचक कमी असल्याने माहिती देण्याचे बहुतांश वेळा टाळले जाते.यामुळे कायद्याचा प्रभाव कमी-कमी होत जातो.

● नागरिक माहिती मागतात.परंतु माहिती मिळत नाही व दुसऱ्या आपिलात माहिती आयुक्ताकडे प्रकरण सुनावणीसाठी येणासाठी वर्षे दोन वर्षे इतका दीर्घ कालावधी लागतो.दरम्यान माहितीची उपयुक्तताही संपूण जाते व न्याय मिळत नाही. यावर प्रखर उपाययोजना व्हायला पाहिजे.

● भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झालेल्या शासन व प्रशासन यंत्रणेसाठी माहिती अधिकार कायदा हा अडचणीचा ठरू लागल्यामुळे या यंत्रणेचा हा कायदा राबविण्याचा हेतु प्रामाणिक राहिला नसल्याचे अनेक प्रकरणावरून दिसून येत आहे.

●माहिती आयुक्तांचा कल हा साधारणपणे सरकारी यंत्रणेतील जनमाहिती अधिकाऱ्यांना अप्रत्यक्षणे अभय देण्याचा असल्याचे अनेक कार्यकर्त्यांना अनुभवास आले आहे.

●अपवाद वगळता बहूतांश म्हणजे जवळपास ९० टक्के शासकीय विभाग व कार्यालयात कलम ४ प्रमाणे एकूण १७ मुद्यावरील माहिती ठेवलेली नाही.तसेच अद्यावत केलेली नाही.अशा एकाही प्रकरणात माहिती आयुक्तांनी कठोर उपाययोजना केलेल्या नाहीत.हे कलम प्रभावीपणे वापरले तर अधिक पारदर्शकता येईल व माहिती मागण्याचे प्रमाणही कमी होईल.परंतु तसे करण्याची शासन व प्रशासन तसेच आयुक्तस्तरावरही इच्छाशक्ती दिसत नाही.




**जनमत संघटीत करा, कार्यकर्त्यांनो एकत्र व्हा ! सरकारवर दबाव आणू आपला कायदा आपणच वाचवू !**

साध्याच माणसांचा
एल्गार येत आहे,
हा थोर दांभिकांचा
गांडू जमाव नाही ! !
गर्दीत गारद्यांच्या
सामील रामशास्त्री,
त्याच्या पल्याड त्यांची
कोठेच धाव नाही !

कवी : मा.सुरेश भट

नेता व पुढारी यांच्यातील फरक : पुढारी म्हणतो, पुढे चला. नेता म्हणतो, आपण पुढे जाऊया...

# जनतेच्या हक्कावर शासन घालतेय कठोर घाव

माहिती अधिकार कायद्याचा वापर करून आरटीआय कार्यकर्त्यांनी आदर्श सारखा घोटाळा उघड केला.तसेच जिल्हा व तालुका स्तरावर शेकडो भ्रष्टाचाराची प्रकरणे उघड केली. सत्तेतून पैसा व पैशातून पुन्हा सत्ता ही राज्यकर्त्यांची कार्यपद्धती असल्यामुळे हा माहिती अधिकार कायदा राज्यकर्ते व प्रशासनातील भ्रष्ट मंडळीसाठी अडचणीचा ठरत असल्याचे त्यांच्या पुरते लक्षात आले आहे.म्हणून चालख राज्यकर्त्यांनी व प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी कट करून प्राथमिक स्तरावर अर्जदारांना माहितीच द्यायची नाही व पूर्ण वेळ माहिती आयुक्तच नियुक्त करायचे नाहीत व दुसरी अपिले लाखोंच्या संख्येने तुंबवून ठेवायची. असे अप्रत्यक्ष ठरविले आहे.वरून असे करून माहिती अधिकार कार्यकर्त्यांना लालफितीत गुंतवून निराश करायचे अशी खेळी सुरू केली असल्याचे दिसत आहे.एका अर्थाने पाहरेकरी मेला तर पाहिजेच पण खूनाचा आरोपही आपल्यावर येवू नये अशी ही चोरांची जशी योजना असते तसेच हे प्रकरण आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणतात की माहिती अधिकारामुळे निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आली आहे.पण त्याच मुख्यमंत्र्यांना राज्यात पूर्णवेळ मुख्य माहिती आयुक्त नेमण्यास वेळ नाही.रामानंद तिवारी यांच्या आदर्श प्रकरणी निलंबनानंतर मुंबई विभागाच्या विभागीय माहिती आयुक्तपदाचा कार्यभार कोणाकडे सोपविला? उत्तर-अद्याप कोणाकडेच नाही.जानेवारी २०११ पासून द्वितिय अपिलांच्या हजारो केसेस प्रलंबित आहेत (तात्पूरता कार्यभार भास्कर पाटील अमरावती यांच्याकडे महिन्याततून पाच दिवस काम बघतात)कोकण विभागाचे विभागीय आयुक्त नवीनकुमार सेवा निवृत्त झाले त्यांच्या जागी कोणाची स्थायी नियुक्त केली ? अजूनही नाही. द्वितिय अपिलांच्या हजारो केसेस प्रलिंबीत.(तात्पुरता कार्यभार शहा नाशिक यांच्याकडे महिन्यातून पाच दिवस काम बघतात) महाराष्ट्रासारख्या प्रगत व संवेदनशील राज्यात पूर्णवेळ मुख्य माहिती आयुक्त अधिकारी कोण ? विलास पाटील जूलै २०११ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर

जर आत्ताच आपण काहीच केले नाही तर ....
२०१५ पर्यंत माहिती अधिकार कायदा मरून गेलेला असेल ?

**PILING UP**

| Year | Complaints | Disposed | Pending |
|---|---|---|---|
| 2006 | 4,923 | 2,905 | 2,018 |
| 2007 | 10,274 | 6,979 | 5,313 |
| 2008 | 14,565 | 10,285 | 9,593 |
| 2009 | 21,509 | 19,633 | 11,469 |
| 2010 | 27,500 | 23,500 | 15,469 |
| 2015* | 62,736 | 33,000 | 90,821 |

* Estimated

_केंद्रीय माहिती अधिकार कायदा हळूहळू निष्प्रभ करून संपून टाकायचा अशी व्यवस्था शासन-प्रशासन स्तरावर निर्माण झाली असून गेल्या सहा वर्षात आयोगाकडे आलेल्या तक्रारी व त्यांचा झालेला निपटारा पाहता.याच वेगाने नागरिकांनी माहिती मागीतली तर २०१५ साली आयोगाकडे १,००००० प्रलंबीत अपिले राहतील.जर तुम्ही तक्रार केलीत तर तुमचा सुनावणीचा नंबर सुनावणीचा वेग पाहता १० वर्षाचा कालवधी लागेल.

२००५ पून देशभर ५० हून अधिक आरटीआय कार्यकर्त्यांच्या हत्या झाल्या.हजारो कार्यकर्त्यांवर प्राणघातक हल्ले झाले.आता आरटीआय कार्यकर्त्यांना सरक्षंण देण्यासाठी माहिती अधिकार कायद्यात प्रभावी तरतूद होण्याची गरज आहे.

त्यांच्या जागी विजय कुवळेकर पुणे यांची तात्पुरती नेमणूक केली.महिन्यातून पाच दिवस कार्यभार पाहत होते.तेही आता ८ जानेवारी पासून निवृत्त झाले.त्यांच्या जागी तात्पूरता कार्यभार भास्कर पाटील यांच्याकडे सोपविला आहे. आता पुणे विभागीय माहिती आयुक्त म्हणून पूर्णवेळ कोणाची नियुक्ती झाली हा प्रश्न पुन्हाअंधारात.

आज हजारो नागरिक माहिती अधिकार कायद्यात अर्ज करतात परंतु जनमाहिती अधिकारी माहिती देण्याचे जाणीव पूर्वक टाळतात. त्या अधिकाऱ्यांना पक्के माहित आहे की माहिती दिली नाही तरी, प्रथम अपिलात आपल्याच कार्यालयातले साहेब आपल्याला साभांळून घेणार आहेत.प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांना हे पक्के ठावून आहे की अपिलात आपण जनमाहिती अधिकाऱ्यांची बाजू घेतली तरी अर्जदार नागरिक दुसरे अपिल करतील तरी त्यांच्या अपिलांची सुनावणीच वषोनुवर्षे होणारच नाही.कारण आता महाराष्ट्रात राज्य माहिती आयोगाच्या मुख्य कार्यालयात व मुंबई विभाग,कोकण विभाग,पुणे विभाग या ठिकाणी पूर्ण वेळ माहिती आयुक्तच नाहीत. त्यामुळे सुनावणीची वेळ येईपर्यंत आपण बदलून जावू किंवा निवृत्त होऊ.त्यामुळे प्रशासनातील अधिकारी निर्धास्त पणे माहिती अधिकाराच्या अर्जाला व अर्जदाराला फाटयावर मारतात. दुसरे म्हणजे गेल्या पाच वर्षात माहिती आयुक्त म्हणून प्रशासनातून निवृत्त झालेल्या सनदी अधिकाऱ्यांची अधिकाधिक नियुक्त झालेली आहे.आयुष्यभर भ्रष्टाचारी साखळीसोबत किंवा त्यांच्या आसपास काम केलेले असल्यामुळे भ्रष्ट अधिकाऱ्यांना साभाळून घेणे किंवा त्याकडे कानाडोळा करणे ही अशा निवृत्त सनदी अधिकाऱ्यांची मानसिकता असते. माहिती आयुक्त म्हणून काम करतानाही असे निवृत्त अधिकारी कायद्याची बूज न ठेवता जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती न दिल्याबद्दल, चुकीची माहिती दिल्याबद्दल,माहिती देण्याचे आदेश देवूनही माहिती न पुरविल्याबद्दल शिक्षा किंवा दंडात्मक कारवाई करीत नाहीत.उलट बहुतांश वेळा माहिती अधिकाऱ्यास संभाळून घेतले जाते. या वर उपाय झालेच पाहिजे

खरे तर माहिती आयुक्त म्हणून सिव्हील सोसायटीमधील अनुभवी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, आणि उच्च न्यायालयतील निवृत्त न्यायाधिश अशा लोकांची नियुक्त व्हायला पाहिजे. आता विनाविलंब महाराष्ट्रात पूर्ण वेळ मुख्य व विभागीय माहिती आयुक्त पदे भरणेसाठी कार्यवाही चालू झाली पाहिजे.या माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी मुख्यंमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच विरोधी पक्षनेते यांना पत्र, निवेदने ,उपोषणे किंवा अन्य लोकशाही मार्गाने मागणी करावी.

(या निवेदनातील काही संदर्भ : प्रसाद बा. तुळसकर,मुंबई यांचे लोकसत्ता मध्ये प्रसिद्ध झालेले पत्रातून घेतले आहेत)

# ही तो शासन-प्रशासनाची (कु) इच्छा !

## प्रलंबीत अपिलांच्या ओझ्याचा घालायचा खोडा

## कायदा दुर्लक्षीत करून मारायचा आरटीआय चा घोडा !



माहितीचा अधिकार कायदा लालफितीच्या माध्यमातून मारून टाकायचा असा शासन व प्रशासन यांच्या माध्यमातून सुनियोजि कट रचला जात आहे. केंद्र व राज्य पातळीवर देशभर जनमाहिती अधिकाऱ्यांनी अर्जदारांना माहिती द्यायची नाही.प्रथम अपिलात अर्जदारांच्या मागणीकडे दुर्लक्ष करायचे,शेवटी अर्जदार जेव्हा राज्य किंवा केंद्रीय आयुक्तांकडे दुसरे अपिल करतो तेव्हा तेथे हजारों अपिलांची रांग लावून ठेवायची.या रांगेत तुमच्या अपिलाच्या सुनावणीसाठी दोन-तीन वर्ष लागेल अशी लालफितीची तरतूदत करायची.पूर्णवेळ आयुक्त नेमायचेच नाहीत.प्रलंबीत अर्जाचा महाप्रचंड भार निर्माण करून आरटीआयचा हा कायदा मारून टाकायचा हा डाव असून देशभरातील सर्व राज्यात अशीच परिस्थिती आहे.हा डाव उधळून लावण्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी एकत्र येण्याची व देशभर व्यापक असे आरटीआय वाचवा अभियान सुरू करण्याची गरज आहे.

महाराष्ट्रात कायद्यानुसार एकूण ११ माहिती आयुक्त नियुक्त करता येतात. प्रत्येक तीन जिल्हयात एक या प्रमाणे आयुक्त नियुक्त करावेत.तसेच दुसऱ्या अपिलांत अधिकाधिक प्रमाणात शास्ती व दंड यांचे प्रमाण वाढविल्याशिवाय प्रशासन स्वच्छ व भ्रष्टाचार मुक्त करण्याचा उद्देश सफल होणार नाही.




महाराष्ट्रात माहिती अधिकार कायद्याखाली जानेवारी २०१२ अखेर पर्यंत सुमोर २०,००० द्वितीय अपिले प्रलंबीत आहेत.सदर अपिले निकालात काढण्याठी मुख्यमाहिती आयुक्त, मुंबई विभाग आयुक्त, कोकणविभाग आयुक्त पुणे विभागीय आयुक्त येथे पूर्णवेळ आयुक्त नाहीत.या ठिकाणी अन्य ठिकाणचे आयुक्त दिवसातून पाच दिवस अपिलांची सुनावणी घेतात.ओव्हरलोड पेन्डसी ठेवायची व माहिती मागणाऱ्यांना न्याय मिळू नये अशी व्यवस्था अप्रत्यक्षपणे राबवायची असा सर्व हा मामला आहे. महाराष्ट्र शासनाची ही खेळी आपण यशस्वी होऊ न देण्यासाठी व्यापक असा संघर्ष उभा करून नागरिकांच्या हक्काचा हा कायदा वाचविलाच पाहिजे अन्यथा ...........

जर तुमच्याकडे नुकसान होईल असे काहीच नसेल तर एक लक्षात ठेवा, तुम्हाला लाभाचा योग ही फारसा असणार नाही

# माहिती अधिकार कायदा वाचवा आंदोलन

माहिती आधिकार कायद्याचा वापर करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी आता एक होऊन माहिती अधिकार हा कायदा वाचविणे, तो अधिक कार्यक्षम व सक्षम करणे यासाठी दीर्घ कालीन लढाई लढावी लागेल.यासाठी देशभरातील माहिती अधिकार कार्यकर्त्यांनो एक व्हा ! असे आवाहन माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या वतीने करण्यात येत आहे.माहिती अधिकार हा कायदा जनतेचा जनतेसाठी व जनतेकडून चालविला जाणारा कायदा आहे.माहिती अधिकार हा लोकशाहीत मतदानाच्या हक्काइतका नागरिकांचा मूलभूत हक्क आहे.हा हक्क शाबुत ठेवण्यासाठी आपणास सर्वांनाच लढावे लागणार आहे.आपली लढाई ही लोकशाहीच्या मार्गाने व शांततापूर्वक असेल.या लढाईत प्रत्येक आरटीआय हा सैनिक असणार असून आपण एकसंघ होवून शासन व प्रशासनावर लोकमताचा दबाव आणणे खूपच आवश्यक आहे.या साठी सातत्याने प्रयत्न होणे गरजेचे आहे. आरटीआय वाचवा आंदोलनाचा एक भाग म्हणून सुरूवातीला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ किंवा तसेय अन्य आरटीआय व्यासपीठांच्या वतीनेमहाराष्ट्रभर संघटीत झालेल्या आरटीआय कार्यकर्त्यांनी खालील उपक्रम राबवावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

मुख्यमंत्र्यांना माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी लिहावयाचे पत्र

प्रति,

मा.श्री. पृथ्वीराज चव्हाण

मुख्यमंत्री, महाराष्ट्र

मंत्रालय, मुंबई

महोदय,

महाराष्ट्रात माहिती अधिकार कायदा लागू होवून सहा वर्षापेक्षा अधिक काळ लोटला.सुरूवातीच्या काळात हा कायदा महाराष्ट्रात प्रभावी पणे अंमलात येणासाठी शासन-प्रशासन स्तरावर योग्य ते प्रयत्न झाले.परंतु गेल्या दोन वर्षापासून महाराष्ट्रात पूर्णवेळ मुख्य माहिती आयुक्त नियुक्त केले नाहीत.तसेच विभागीय स्तरावरही माहिती आयुक्ताकडून लोकाभिमूख कार्य होताना दिसत नाही.माहिती न दिल्यास जनमाहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हायलाच पाहिजे परंतु कायद्याला बगल देवून जनमाहिती अधिकाऱ्यांना अभय देण्याचा अधिक प्रयत्न झाल्याचे दिसत आहे.गेल्या दोन वर्षात पाच लाखाहून अधिक व्यक्तींनी माहिती अधिकार कायद्याचा वापर केला परंतु त्यातील सुमारे चार लाख लोकांचे जनमाहिती अधिकाऱ्याकडून पूर्ण समाधान झाले नाही.लोकशाहीत जेव्हा कायदा जनआंकाक्षाच्या कसोटीवर खरा उतरत नाही तेव्हातो लोकशाहीचा खून असतो.ही बाब आपण गंभीरपणे विचारत घ्यावी.माहिती आयुक्त म्हणून शक्यतो निवृत्त न्यायाधिश,अनुभवी सामाजिक कार्यकर्ते यांना त्वरीत नियुक्त करावे. माहिती अधिकार कलम -४ नुसार स्वच्छे ने जाहिर करायची माहिती ९० टक्के कार्यालयात जाहिरच केलेली नाही.महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्याच्या वेबसाईट गेल्या चार-पाच वर्षापासून अपडेट केलेल्या नाहीत.याकडे लक्ष द्यावे.

आज माहिती अधिकारांचा वापर करणारे लाखो नागरिक कायद्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत असमाधानी असून आपण या गंभीर विषयात लक्ष घालून महाराष्ट्र देशी या कायद्याची होत असलेली पडझड थांबवावी ही विनंती

दिनांक : आपला विश्वासू

ठिकाण सही

## आपल्या जिल्हयातील जिल्हाधिकारी व तालुक्यातील तहसीलदार यांच्या मार्फत राज्य सरकारला निवेदन द्यावे.

या निवेदनात राज्य माहिती अधिकार आयुक्तांची रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी करावी.सदर पदे भरताना प्राधान्याने निवृत्त न्यायधिश व अनुभवी समाज सेवक यांचा विचार व्हावा.तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५च्या कलम २६अन्वये माहिती अधिकार कायद्याचा सर्वसामान्य जनतेपर्यंत अधिक प्रभावी प्रचार व प्रसार व्हावा यासाठी शासनाने स्वयंसेवी संस्थाना मदत करावी,प्रचार साहित्य प्रकाशीत व वितरीत करावे.अशी सदर निवेदनात मागणी करावी.

अशाच निवेदनाच्या प्रती आपल्या,भागातील आमदार तसेच खासदारांनाही द्याव्यात त्यांना माहिती अधिकार कायदा प्रभावी करण्यासाठी व त्यातील त्रूटी दूर करण्यासाठी व शासनाची अनास्था दूर करण्यासाठी विधीमंडळात व संसदेत आवाज उठवावा असे निवेदनात आवाहन करण्यात यावे. तुमचा एक प्रयत्न हा कायदा वाचविण्यासाठी तसेच हा कायदा सक्षम करण्यासाठी खूपच उपयुक्त होवू शकतो तसेच सोबत पत्राचा नमुना दिला आहे.कार्यकर्त्यांनी तो आधार घेवून मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री व विरोधी पक्ष नेते यांना पत्रे लिहावीत.

**व्यापक ध्येय प्राप्तीच्या प्रवासात मिळालेला तत्कालीन पराभव हा खरा पराभव नसुन तो विजय असतो.**

रेशन कार्ड, पासपोर्ट,वाहनचालक परवाना,विविध कामातील अनियमिततेबदलच्या तक्रारी,सातबारावरील फेरफार शासनाकडून मदत व अर्थसाहय मागणी अशा विविध कामासाठी शासनाकडे केलेल्या अर्जावर काय कारवाई झाली याची माहिती मिळवण्यासाठी माहितीच्या अधिकारात अर्ज करता येतो अशा अर्जाचा हा एक नमूना

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती आधिकारी
संबधीत कार्यालयाचे नाव---------------
पता --------------------
१) अर्जदारांचे नाव -------------------------------------------
२) पत्ता : ----------------------------------------------------
३) माहितीचा विषय : आपल्या शासकीय कार्यालयातील मी अर्ज नाव ---------------
यानी दि.---------- रोजी केलेल्या अर्जावर(सोबत मूळ अर्जाची झेरॉक्स प्रत जोडली आहे.) आपल्या कार्यालयाने काय कारवाई केली याची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मिळण्यासाठीचा अर्ज
४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी(खालीलप्रमाणे)
अ) मी आपल्या कार्यालयाकडे ----------------- रोजी -------------- विभागात --------------------- या माझ्या मागणीसाठी अर्ज केलेला आहे.माझा अर्जावर आज रोजी अखेर पर्यंत काय कारवाई झाली ? काय निर्णय झाला
२).माझा अर्ज आपणास मिळल्यापासून आजपर्यंत कोणकोणत्या अधिकाऱ्यासमोर कधी व केव्हा विचारार्थ व निर्णय घेण्यासाठी ठेवला गेला.अधिकाऱ्यांचा नाव, हुद्द्दा व पत्ता द्यावा.अर्जावर काय निर्णय झाला.अर्जावर कोणत्या अधिकाऱ्याने काय शेरा किवा टिपण्णी लिहीली.याचा कागदोपत्री छायांकित प्रतीसह माहिती द्यावी.
ब) मी केलेल्या अर्जावर संबधीत विभागातील कायद्यानुसार तसेच दप्तरदिरंगाई कायद्यातील तरतूदीनुसार किती दिवसाच्या आत कारवाई पूर्ण होवून माझे काम होणे आवश्यक होते. जर अशी कारवाई व माझे काम पूर्ण झाले नसेल तर त्यास कोणते अधिकारी जबाबदार व शास्तीस पात्र आहेत त्यांचे नाव, हुद्दा व पत्ता द्यावा.
क) माझे काम कायदेशीर मुदतीत पूर्ण न करणाऱ्या अधिकाऱ्यावर काय कायदेशीर कारवाई होईल ? व माझे काम कधी पूर्ण होईल याची माहिती द्यावी
ड) आपल्या कार्यालयात विविध कामासाठी निश्चित कालवधीची माहिती असणारी नागरिकांची सनद ची एक प्रत मला मिळावी.
इ) ५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :
६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही
दिनांक : -------------------- (नाव -----------------)
मो.:

यशामुळे आपण दुनियेला माहिती होतो,अपयशामुळे आपल्याला दुनिया माहित होते.

# आपल्या गावातील /तालुक्यातील /शहरातील रस्ते,गटारे,इतर बांधकाम आदि विकास कामाची तपासणी करणारा अर्ज नमूना

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

ग्रामपंचायत/जिल्हा परिषद बांधकाम विभाग / नगरपालिका / सार्वजनिक बांधकाम विभाग

-----------------------------------

१) अर्जदारांचे नाव ----------------------------------------------

२) पत्ता : ----------------------------------------------------

३)माहितीचा विषय : आपल्या विभागातील --------- व -------- या कामाची------------ गावातील ----------- ----- या बांधकामाविषयीची माहिती मिळणेबाबत

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी(खालीलप्रमाणे)

अ) सन २०१० व सन २०११ मध्ये आपल्या कार्यालयाच्या मार्फत झालेल्या ------------- या गाव /वार्ड/ परिसरातील / शहरातील / विभाग / सर्व बांधकामाची सूची व वर्गवारी नुसार उपलब्ध ती सर्वमाहिती द्यावी.

ब) आमच्या परिसरात / गावात / वार्डात / शहरात / आपल्या विभागाच्यावतीने --------------------- हे बांधकाम चालू आहे या बांधकामाची खालील मुद्यानिहाय माहिती द्यावी

१) कामाचे नाव

२) कामाचे मंजूरी आदेशाची प्रत

३) ठेकेदार / कंत्राटदाराचे नाव, व निवीदांचा तुलनात्मक तक्ता

४) काम सूरू झाल्याचा दिनांक व काम समाप्तीची मुदत

५) ठेकेदारांना मंजूर झालेल्या / अदा केलेल्या रक्कमेचा तपशील / बाकी देय रक्कम तपशील

६) कामाचे मोजमाप पुस्तिका

क) सदर काम किती दिवस उपयुक्त राहिल यांची गॅरंटी बांधकाम व्यावसायिकाबरोबर झालेल्या करार पत्रात झालेली आहे काय ? असल्यास याची एक प्रत द्यावी.नसल्यास अशी कामाची गुणवत्ता कोणत्या निकषावर केली गेली आहे ? व सदर निकष कोणत्या कायद्यानुसार बनविले आहेत याचा लेखी तपशील द्यावा.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------- अर्जदाराची सही

दिनांक : --------------------- (नाव -----------------)

मो.:

पराभव हसत मुखाने स्विकारणे हे खंबीर मनाचे लक्षण आहे.यशाने बेहोष होणे हे दुर्बल मनाचे लक्षण आहे.

# गावातील सार्वजनिक हातपंपाची स्थिती व त्यावरील खर्च याची माहिती मागविण्यासाठी अर्जाचा नमुना

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

गट विकास अधिकारी

-----------------------------------

१) अर्जदारांचे नाव ---------------------------------------------

२) पत्ता : ----------------------------------------------------

३) माहितीचा विषय :---------------- गावातील सार्वजनिक हातपंपाची आजची स्थिती व त्यावरील खर्च याची माहीती मिळणेबाबत.(कालावधी सन २००० ते २०१२)

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी(खालीलप्रमाणे)अ) सन २००० ते सन २०११ मध्ये आपल्या कार्यालयातील अद्यावयात नोंदी प्रमाणे ------------------ या गावातील / पंचायत समिती विभागात किती हातपंप बसविलेले आहेत.यातील सद्या चालू किती आहेत. किती बंद आहेत ?

ब) -------------- या गावातील एकूण हातपंपाची सख्या, हातपंपाच्या ठिकाणचा पत्ता,प्रत्येक हातपंप खोदणे व हातपंप बसविण्यासाठी झालेला खर्च,याचा तपशील देणे

क) ------------ या गावातील पंचायत समिती गणातील हातपंप दुरूस्ती व निगाराखणीचे काम कोणत्या खासगी किंवा सरकारी एजन्सीकडे दिलेले आहे काय ? असल्यास संबधीत एजन्सीचे नाव व पत्ता तसेच प्रत्येक हातपंपाच्या निगा व दुरूस्तीसाठी खर्च झालेला निधी याची कागदोपत्री तपशीलसह माहिती द्यावी

ड) ------------- या गावातील/पंचायतसमिती गणातील किती हातपंप नादुरूस्त आहेत या पंपाची यापूर्वी दुरूस्ती केव्हा व किती वेळा झाली ? सद्या सुरू असलेल्यां पपाची केव्हा व कितीवेळा दुरूस्ती झाली यावर किती खर्च झाला.

फ) गावात किती लोकसंख्ये मागे किती हातपंप असावेत असे शासनानेच काय नियम निकष व तरतूदी आहेत.या विषयी शासनाचा अद्यादेश परिपत्रक व कायदेशीर कागदपत्रांच्या छायांकित प्रती द्याव्यात.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही

दिनांक : --------------------- (नाव ----------------)

मो.:

निर्जन वनातील फुल आपल्याच मस्तीत फुलतं,मनापासून खुलतं, आपले सौंदर्य कोणी पाहिल न पाहिल याची ते तमा बाळगीत नाही.

शेवटचे पान ..

# प्रेरणा

## इसलिए राह संघर्ष की.....

जिंदगी आंसूओंसे नहाई न हो
शाम सहमी न हो,रात हो ना डरी
भारे की आँख फिर डबडबाई न हो
इसलिए राह संघर्ष की हम चूने...
सूर्य पर बादलो का यू न पहेरा रहे
रोशनी रोशनाई में डूबी न हो
यू न इमान फुटपाथ पर हो खडा
हर समय आत्मा सबकी उबी न हो
आसमाँ पे टंगी हो न खुशहॉलीयाँ
कैद महलोंमें सबकी कमाई न हो
इसलिए राह संघर्ष की हम चूने
कोई अपनी खुशीके लिए गैरोंकी
रोटीयाँ छीन ले, हम नही चाहते
छीट कर थोडा चारा कोई उम्र की
हर खूशी छीन ले, हम नही चाहते
हो किसी के लिए मखमली बिस्तरा
और किसी के लिए एक चटाई न हो
इसलिए राह संघर्ष हम चूने......
अब तमन्नाएँ फिर ना करे खुदखूशी
खाँब पर खौफकी चौकशी ना कर
श्रम पाँवो में हो ना पडे बेडीयाँ
शक्ती की पिठ पर अब जादती ना रहे
दम तोडें कही भूख से बचपना
रोटीयों के लिए फिर लढाई न हो
इसलिए राह संघर्ष हम चूने .....

पोस्ट परवाना No.G/NMD/128/2012-14

प्रति,

पाठविणार
पत्ता: नागरिक अधिकार
प्लाट नं. ई-१६, सेक्टर-१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३५४६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
रजि नं.MAHMAR/2011/40781